एस.सी.सी. ४८४/२०२३
सरकार वि. भरत व इतर.
**निशाणी २५ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

| | |
|---|---|
| माझे नाव — संपत तुळशीराम भोर, | वय — ४८ वर्षे, |
| व्यवसाय — शेती, | राहणार — अंबड, |
| तालुका – अकोले, | जिल्हा – अहमदनगर. |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. दिपक भोर हा माझा पुतण्या आहे. त्याचे लग्न कोणासोबत झाले होते याची मला माहीती नाही. घटना अंदाजे १ वर्षापुर्वी पिंपळगाव येथे संध्याकाळी घडली होती. तेथे माझा पुतण्या दिपक रामहरी भोर याचे तोरमल यांचे सोबत किरकोळ बाचाबाची झाली होती. याव्यतिरीक्त काहीही घडले नव्हते. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. उपरोक्त घटनेव्यतिरीक्त मी जबाब देतेवेळी काहीही सांगितले नव्हते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे मला माहीती नाही की, माझा पुतण्या दिपक हा अगस्ती कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना त्याची ओळख अपेक्षा तोरमल हिचेसोबत झाली व त्यांनी दिनांक २८.१२.२०२२ रोजी आळंदी येथे जावून रजिस्टर

लग्न केले. हे म्हणणे खरे नाही की, सदर लग्नाबाबत त्याने मला सांगितले होते. हे मला माहीती नाही की, अपेक्षाचे नातेवाईक हे तिला नांदण्याकरीता आडवत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझा पुतण्या दिपक व माझी बहीण सुनिता असे दिनांक १७.०६.२०२३ रोजी संध्याकाळी ०७:३० वाजता अपेक्षा हिच्या घरी पिंपळगाव येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे सर्व आरोपी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना अपेक्षा हीस नांदविण्यास पाठविण्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी प्रदीप भालेराव, सुमीत जाधव यांनी माझा पुतण्या यास लाथाबुक्कयांनी मारहाण करून शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझी बहीण सोडवण्याकरीता गेलो असता सर्व आरोपींनी आम्हाला लाथाबुक्कयांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी, तुम्ही परत जर इकडे आले तर जिवे ठार मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेमुळे माझ्या पुतण्याने शेतात फवारणीचे औषध घेतले. साक्षीदार परत सांगतो की, त्याने औषध कशामुळे घेतले हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याने औषध घेतल्यामुळे मी त्यास हरिश्चंद्र हॉस्पीटल येथे ॲडमीट केले.

३. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचून दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तसा माझ्या जबाबात का नमूद केला याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. के. बी. हांडे यांच्या मार्फत</u>**

४. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०६.२०२३ रोजी मी, माझा पुतण्या व बहीण सुनिता असे अपेक्षा हिच्या घरी पिंपळगाव येथे गेलो

होतो हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे मारहाण, शिवीगाळ, धमकी असा कोणताही प्रकार घडला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब पोलीसांनी लिहीला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये काय लिहीले हे मला माहीती नाही.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.12 17:02:52 +0530

दिनांक १२.०१.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट नं. २, अकोले.